# ऋणनिर्देश

आजच्या काळात समाजाच्या सर्वांगिण विकासामध्ये ग्रंथालयाचे महत्त्वाचे स्थान आहे. सार्वजनिक ग्रंथालये ही सेवाभावी कार्य करणाऱ्या संस्था म्हणून कार्यरत आहेत. त्या अनुषंगानेच मी समाजातील सर्व घटकांना विविध क्षेत्रात उपयोगी पडणारी उपयुक्त अशी माहिती पुरवून निर्मितीक्षम स्वावलंबी नागरिकांची व वाचकांची जडणघडण करणारी सार्वजनिक ग्रंथालये या महत्त्वपूर्ण सेवाभावी संस्थेंवर शोधप्रबंध लिहिण्याचा निर्णय घेतला त्यामुळे 'सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रशासन : एक अभ्यास' (विशेष संदर्भ - कोल्हापूर जिल्ह्यातील शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालये) हा विषय संशोधनासाठी निवडला. या विषयाला माझे मार्गदर्शक डॉ. दादासाहेब रा. शिरगावे सर यांनी सहमती दर्शविली. त्यांचे सहकार्य, प्रेरणा व मार्गदर्शन यामुळेच हा शोधप्रबंध मी पूर्ण करु शकलो. त्यांच्या ऋणातून उतराई होण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहण्यातच मला आनंद वाटेल.

कोणतेही कार्य मार्गदर्शनाशिवाय पूर्ण होत नाही. शोधप्रबंध लिहिताना राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मीनारायण तारोडी सर, डॉ. अशोक चौसाळकर सर, डॉ. सौ. व्ही. पी. रासम मॅडम, प्रा. सौ. भारती पाटील मॅडम, डॉ. के. के. कावळेकर सर, डॉ. मेघा नानीवडेकर मॅडम या गुरुवर्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्यांचे मी अंत:करणपूर्वक आभार मानतो.

प्रबंधपूर्तीच्या कामी कोल्हापूर जिल्ह्यातील नऊ शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपाल, कार्यकारी मंडळ, कर्मचारी वर्ग, तसेच वाचक सभासद यांनी माहिती उपलब्ध करुन दिली व वेळोवेळी सहकार्य केले. याबद्दल त्यांचे आभार मानतो. मध्यवर्ती सार्वजनिक ग्रंथालय, मुंबईचे संचालक श्री दिगंबर चव्हाण साहेब तसेच पुणे विभागीय ग्रंथालयाचे सह संचालक श्री उजळंबकर यांनी आवश्यक ती माहिती दिली त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

मला शिक्षणासाठी सतत प्रेरणा देणारे माझे आई-वडील व कुटुंबीय यांचे आशिर्वाद हे माझे सामर्थ्य आहे. मला शोधप्रबंध लिहिताना माहिती मिळविण्यासाठी सतत सहकार्य देणारे सर्व मित्र, मैत्रिणी, राज्यशास्त्र विभागातील श्री अभिजीत पाटील, श्री.ठोमके तसेच श्री संभाजी तोरस्कर, श्री. अरुण वणिरे यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

या विषयाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देणाऱ्या कार्यात कोल्हापूर जिल्ह्यातील शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालये, दैनिक सकाळ, दै. पुढारी, दै. तरुण भारत व शिवाजी विद्यापीठातील बॅ. खर्डेकर ग्रंथालय, जिल्हा ग्रंथालय संघ, कोल्हापूर यांची मोलाची मदत मिळाली. या शोधप्रबंधाचे काम तत्परतेने पूर्ण करुन देणारे श्रीकांत कॉम्प्युटर्स, कोल्हापूर तसेच या कामी ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य, प्रोत्साहन लाभले त्या सर्वांचे आभार मानतो.

धन्यवाद !

**नामदेव रघुनाथ गवळी**